Phone No: 02363/ 272005
Email ID:dcfsawantwadi@gmail.com

महाराष्ट्र शासन
उपवनसंरक्षक, सावंतवाडी वन विभाग यांचे कार्यालय
वन भवन सालईवाडा, सावंतवाडी, पिन कोड ४१६ ५१०, जि. सिंधुदुर्ग

जा. क्र. ब/ नोसेल कक्ष/निरुखे पाटबंधारे प्रकल्प/२०२२-२३/८९
सावंतवाडी ४१६ ५१०, दि. २९.०७.२०२२

**विषय-** वन (संवर्धन) अधिनियम, १९८० अंतर्गत सादर करावयाचा प्रस्ताव
निरुखे लघु पाटबंधारे प्रकल्पकामी मौजे निरुखे, ता. कुडाळ येथील १८.९४ हे. आर वनक्षेत्र वळतीकरण करण्याबाबतचा प्रस्ताव

**संदर्भ-**
१. उप वनसंरक्षक सावंतवाडी कार्यालयाचे पत्र क्रमांक A/Desk/Nosel/Nirukhe Project/ 22-23/32, Dated 07.04.2022
२. मुख्य वनसंरक्षक (प्रा.), कोल्हापूर कार्यालयाचे पत्र क्रमांक D-6/Nosel/Saw/Irrigation/ Nirukhe/22-23/340, Dated 30.06.2022
३. मा. अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक व केंद्रस्थ अधिकारी, महाराष्ट्र राज्य, नागपूर यांचेकडील पत्र क्रमांक Desk-17/Nodal/ Kolhapur/ ID-13121/ (29)/890/22-23, Dated 13/07/2022
४. मुख्य वनसंरक्षक (प्रा.), कोल्हापूर कार्यालयाचे दि. १४.०७.२०२२ रोजीचे दूरध्वनी संदेश

निरुखे लघु पाटबंधारे प्रकल्पकामी मौजे निरुखे, ता. कुडाळ येथील १८.९४ हे. आर वनक्षेत्र वळतीकरण करणेबाबतचा प्रस्ताव (स्टेज- १ मान्यतेकामी) उप वनसंरक्षक, सावंतवाडी कार्यालयाचे पत्र क्रमांक A/Desk/Nosel/Nirukhe Project/22-23/32, Dated 07.04.2022 अन्वये मुख्य वनसंरक्षक (प्रा.), कोल्हापूर कार्यालयास सादर करणेत आलेला आहे. तसेच सदरचा प्रस्ताव मुख्य वनसंरक्षक (प्रा.), कोल्हापूर कार्यालयाने संदर्भ क्रमांक २ अन्वये मा. अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक व केंद्रस्थ अधिकारी, महाराष्ट्र राज्य, नागपूर यांचे कार्यालयास सादर केलेला आहे.

प्रस्तुत प्रस्तावामध्ये मा. अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक व केंद्रस्थ अधिकारी, महाराष्ट्र राज्य, नागपूर यांनी संदर्भीय पत्र क्रमांक ३ अन्वये त्रुटी उपस्थित केल्या आहे. सदर उपस्थित त्रुटींपैकी मुद्दा क्रमांक १ अन्वये सुधारीत KML File सादर करणे व मुद्दा क्रमांक २ अन्वये सुधारीत प्रमाणपत्र क्रमांक ९ (Compensatory Afforestation Area Suitability Certificate by Deputy Conservator of Forests) सादर करणेबाबत सूचित करण्यात आलेले आहे.

प्रस्तुत प्रकल्प यंत्रणेने विषयांकित प्रकल्पकामी केंद्रे बुद्रुक, ता. दोडामार्ग, जि. सिंधुदुर्ग येथील सर्व्हे क्रमांक २३/१ मधील एकूण ३६.०२.८० हे. आर क्षेत्रापैकी १८.९४ हे. आर क्षेत्र पर्यायी वनीकरणास देण्याबाबत प्रस्तावात नमूद केलेले आहे. यास्तव प्रकल्प यंत्रणेमार्फत प्रस्तावित करण्यात आलेल्या पर्यायी क्षेत्राची स्थळ पाहणी (Site Inspection) करणे आवश्यक आहे. त्या अनुषंगाने प्रस्तावित करण्यात आलेले पर्यायी वनीकरण क्षेत्र हे लागवडी योग्य आहे किंवा कसे; वनक्षेत्रास लागून आहे किंवा कसे, सदर क्षेत्रावरील वृक्ष/ झाडोरा यांची घनता Sample Plot घेऊन करणे, सदर क्षेत्र अतिक्रमण मुक्त आहे किंवा कसे, व अन्य तद्नुषंगिक आवश्यक त्या सर्व मुद्यांच्या अनुषंगाने सदर क्षेत्राची पाहणी करणे आवश्यक आहे.

यास्तव सहाय्यक वनसंरक्षक (प्रादेशिक व कॅम्पा), सावंतवाडी व वनक्षेत्रपाल, दोडामार्ग यांनी प्रकल्प यंत्रणेच्या संबंधितांसमवेत उक्त परिच्छेदात नमूद केलेल्या आवश्यक त्या सर्व मुद्यांच्या अनुषंगाने स्थळ पाहणी करावी. तसेच सदर स्थळ पाहणीचा साद्यंत अहवाल वेगळ्याने इकडील कार्यालयास सादर करावा. जेणेकरुन निम्नस्वाक्षरीकर्ता यांना सदर क्षेत्राच्या स्थळ पाहणीचे नियोजन करता येईल.

(दि. प्र. खाडे)
उपवनसंरक्षक
सावंतवाडी वन विभाग सावंतवाडी

o/c
Phele

प्रति- सहाय्यक वनसंरक्षक (प्रादेशिक व कॅम्पा), सावंतवाडी

प्रति- वनक्षेत्रपाल, दोडामार्ग

प्रत- कार्यकारी अभियंता, लघु पाटबंधारे विभाग, ओरोस- सिंधुदुर्ग यांना माहितीसाठी

CamScanner